स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

जा.क्र. प्रशा/विस्तारीत/चहा व कॉफी पु.ठे./प्र.प/ २७०८ /२०२५-२६ दि. :-१०/२/२०२६.

## प्रसिध्दी पत्रक

विषय :- चहा व कॉफी पुरवठा करणेकामी दरपत्रके सादर करणेबाबत.

वरील विषयास अनुसरून आपणास कळविणेत येते की, बाजार समितीचे मुख्य कार्यालयामधील पदाधिकारी, अधिकारी / कर्मचारी व आरोग्य विभागातील कर्मचारी यांना दिवसातून एक वेळा चहा पुरवठा करणे तसेच मुख्य कार्यालयामध्ये येणाऱ्या अभ्यंगतांकरीता सुचनेनुसार चहा व कॉफी पुरवठा करणे कामाचा एक वर्ष कालावधीसाठी ठेका देणेकामी दरपत्रके मागवित आहोत.

सदर काम करणेकामी खालील नियम व अटींचे अधीन राहून आपले कमीत कमी दराचे दरपत्रक सिलबंद पाकीटामध्ये दि. १८/०२/२०२६ अखेर दु. १.०० वाजेपावेतो संस्थेच्या मुख्य कार्यालयातील विस्तारीत विभागामध्ये पोहोच करावे.

नियम, अटी व शर्ती :-

१. सदर ठेक्याची मुदत (दि. ०१/०३/२०२६ ते दि. ३१/०३/२०२७) एक वर्ष कालावधीसाठी असेल.
२. सदर ठेक्यापोटी रक्कम रूपये १०,०००/- सुरक्षा अनामत भरणा करणे बंधनकारक असेल. सदर अनामत रक्कम बिनव्याजी असेल व ती ठेका कालावधी संपलेनंतर परत करणेत येईल.
३. चहा / कॉफी बनविणेसाठी बाजार समितीचे मुख्य कार्यालयातील कॅन्टीनची ८० चौ.फु. जागा वापरायची असून त्यापोटी बाजार समितीस दरमहा दर महिन्याचे पाच तारखेपर्यंत रूपये ३०००/- + रू ५४० (१८%GST) याप्रमाणे एकुण रक्कम रूपये ३५४०/- मासिक भाडे भरणा करणे बंधनकारक असेल.
४. सदर कॅन्टीन मध्ये चहा व कॉफी बनविणेसाठी आवश्यक सर्व साहित्य आपण स्वत: ठेकेदाराने उपलब्ध करून वापरवयाचे आहे.
५. चहा व कॉफीचा दर्जा उत्तम असावा, चहा पुरवठा करणाऱ्या कर्मचाऱ्याची वागणूक बाजार समितीचे अधिकारी, कर्मचारी यांचेशी सौजन्याची असावी. याबाबत तक्रार प्राप्त झाल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता ठेका रद्द करणेत येईल.
६. चहा / कॉफी बनवित असताना अथवा वाटप करताना कर्मचाऱ्यास नैसर्गिक, अनैसर्गिक अथवा इतर कोणत्याही प्रकारची घटना घडून कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.
७. बाजार समितीचे कर्मचारी यांनी सुचित केलेनंतर तात्काळ चहा / कॉफी पुरवठा करणे बंधनकारक असेल.
८. दररोज पुरवठा केलेल्या चहा व कॉफीची संख्या संबंधित विभागाकडे रूजवात करून दरमहा देयक सादर करताना त्यासोबत पुरवठा केलेली चहा व कॉफींची संख्या संबंधित विभाग प्रमुखांनी तपासून प्रमाणित केलेली असणे आवश्यक आहे.
९. दरपत्रक मंजुर झालेनंतर सदर कामाचा करारनामा १५ दिवसांत करून देणे बंधनकारक असेल.
१०. दरपत्रकामध्ये फर्मचा जी.एस.टी. क्रमांक, पत्ता, दुरध्वनी क्रमांक नमूद करावा.
११. मुदतीनंतर दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७

१२. दरपत्रक उघडतेवेळी दरपत्रकधारक अथवा त्यांचे प्रतिनिधीने बाजार समितीचे मुख्य कार्यालयात वेळेत हजर रहावे.

१३. कोणतेही दरपत्रक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समितीने राखून ठेवला आहे.

१४. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.१८/०२/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयात मा. सहसचिव यांचे दालनात दरपत्रके सीलबंद असलेची खात्री करून उघडणेत येतील. दरपत्रके उघडणेचे वेळेत बदल झाल्यास ठेकेदारांना दुरध्वनीव्दारे कळविणेत येईल याची नोंद घ्यावी.

१५. नियम व अटी मान्य असणाऱ्या ठेकेदारांनीच दरपत्रके सादर करावीत.

सचिव

**कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे**